# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

## कार्यकारीणी सभा

## संयुक्त सभा – फळसेवाडी-पिसेकामते आणि वरवडे-फळसेवाडी

**दिनांक** : रविवार 30 जानेवारी 2011

**स्थळ** : 14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 9. श्री गुरुनाथ गणपत राणे |
| 2. श्री पांडूरंग सावजी राणे | 10. श्री रंजन रावजी म्हसकर |
| 3. श्री जयवंत नाना राणे | 11. श्री अशोक दत्ताराम राणे |
| 4. श्री शंकर बाळकृष्ण राणे | 12. श्री हेमंतकुमार रमेश राणे |
| 5. श्री विश्वनाथ (पिंटू) जाधव | 13. श्री सुनिल विनायक राणे |
| 6. श्री कांता रामचंद्र राणे | 14. श्री उदय भगवान राणे |
| 7. श्री मधुसूदन श्रीधर राणे | 15. श्री मंगेश मनोहर राणे |
| 8. श्री दशरथ दत्ताराम साटम | |

फळसेवाडी हितकारी संस्था, मुंबई या संस्थेच्या कार्यकारीणीची सभा रविवार दिनांक 30 जानेवारी 2011 रोजी सायंकाळी 5:00 वाजता श्री मंगेश मनोहर राणे यांच्या घरी आयोजित करण्यात आली. सभेस 15 सभासद उपस्थित होते.

या प्रसंगी श्री मंगेश मनोहर राणे काही काळ उपस्थित नसल्यामुळे संस्थेचे उपाध्यक्ष श्री पांडूरंग सावजी राणे यांना अध्यक्ष स्थान देऊन तसेच जेष्ठ नागरीक श्री मधुसुदन श्रीधर राणे यांना सल्लागार स्थान देऊन बहूमान करण्यात आला.

यासभेमध्ये फळसेवाडी शाळा क्रमांक 2 ला 75 वर्षे झाल्यामुळे डायमंड ज्युबली वर्ष साजरे करण्याबाबत चर्चा घेण्यात आली.

चिटणीसांनी सर्व प्रथम अध्यक्ष व सल्लागार यांच्या वतीने सर्व उपस्थितांचे स्वागत केले. विशेषत: श्री दशरथ दत्ताराम साटम हे या कमिटीमध्ये सहभागी झाले त्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानन्यात आले. त्यानंतर हा शाळेचा उत्सव कसा साजरा करावा, रुपरेखा कशी असावी याबद्दल चर्चा झाली.

चर्चा सुरू करण्यापूर्वी चिटणीसांनी शिरोडकर हायस्कूल, परेल येथे संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचन केले. तसेच वाडीतील सध्या मुंबईस्थित राहणारे सभासद व नोकरदार यांची संपूर्ण माहीती सभाग्रहास दिली जेणेकरून वर्गणीदार किती उपलब्ध होतील याबद्दल सभाग्रहास माहीती मिळावी हा उद्देश होता.

पिसेकामते-फळसेवाडी यांची सभासद संख्या साधारण 120 पर्यत होते. त्याचवेळी वरवडे-फळसेवाडी ग्रामस्थ श्री कांता राणे यांनी सभाग्रहास अशी माहिति दिली की वरवडे-फळसेवाडी संबधीत मुंबईत वा गावी साधारण 30 ते 40

सभासद आहेत. दोन्ही वाड्यांची सभासद संख्या पाहता साधारण 150 पर्यंत होईल. हा आकडा विचारात घेऊन साधारण रु.75,000/- वर्गणी रुपाने जमू शकतात असा अंदाज घेण्यात आला व त्यानंतर खर्चाची ताळमेळ-बजेट तयार करण्यात आले व आखणी करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 1. | संस्थेच्या व शाळेच्या माहितीचे 8 बॅनर तयार करणे व बॅनर लावण्याचे ठिकाण ठरविणे | रु.5,000/- |
| 2. | मंडप, स्टेज, डेकोरेशन इत्यादि | रु.15,000/- |
| 3. | श्री सत्यनारायण महापूजा, महाप्रसाद (40 माणसे, वेळ दुपारी 1:00 ते 4:00 पर्यंत) | रु.25,000/- |
| 4. | पुजेचे सामान, भटजी, पुजा साहित्य, पुजा प्रसाद | रु.5,000/- |
| 5. | जेष्ठ नागरिक यांचा सत्कार (शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ – अंदाजे 20 ते 25 नागरिक) | रु.5,000/- |
| 6. | मा नामदार श्री नारायणराव राणे (उद्योगमंत्री), खासदार श्री निलेश राणे, श्री नितेश राणे स्वाभिमान संघटना तसेच इतर पाहूणे यासाठी सत्कार, चहापाणी खर्च तसेच जुने शिक्षक यांचा सत्कार | रु.15,000/- |
| 7. | सुस्वर भजन | रु.1,000/- |
| 8. | दहिकाला | रु.10,000/- |

आदल्या दिवशी रक्तदान शिबीर भरविण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर चिटणीसांनी जिल्हा परिषद पुर्ण प्राथमिक शाळा ओझरम – 1, तालूका कणकवली, जिल्हा सिंधूदूर्ग, स्थापणा 1910, जनता हायस्कूल, वरळी यांचे अहवाल सभाग्रहास दाखविले. त्यानुसार प्रेरणा घेऊन एक स्मरनिका काढण्याचे ठरले. यासाठी सर्वकक्ष चर्चा होऊन एक स्मरनिका काढण्याचे ठरले.

स्मरनिका कमिटी
(1) श्री दशरथ दत्ताराम साटम (2) श्री रंजन रावजी म्हसकर (3) श्री अशोक दत्ताराम राणे (4) श्री उदय भगवान राणे (5) श्री प्रकाश सावंत (वरवडे) (6) श्री हेमंतकुमार रमेश राणे (7) श्री उत्तम वामन राणे (8) श्री श्यामसुंदर गोपाळ राणे (वरवडे) (9) श्री मंगेश मनोहर राणे अशी 9 ग्रामस्थांची कमिटी बनविण्यात आली व त्या कमिटीस पूर्ण अधिकार देण्यात आले. तसेच रु.500/- वर्गणी सोडून आपले मनोगत / जाहिरात याचे वेगळे पैसे देऊन स्मरणिकेमध्ये भाग घेऊ शकतात.

स्मरणिकेत पंच मंडळी नावे, शिक्षकांची नावे, आताची कमिटी, व गावची माहिती हे पाने असतील हे नमुद करण्यात आले. तसेच कदमवाडी, मधलीवाडी, कोरमळ, खांदारवाडी या वाड्यांस आमंत्रण देण्याचे ठरले.

वर्गणी वसुलीसाठी प्रथम कुटूंबप्रमुखांचे नावे परिपत्रक काढून त्याबरोबर त्या घराची लिष्ट देण्याचे ठरले जेणेकरून वर्गणी वसुल होऊ शकते. तसेच कार्यक्रमास येणारया पैसे व चेक यांची गुंतवणूक करण्यासाठी एक स्वतंत्र खाते अध्यक्ष, खजिनदार व चिटणीसांच्या स्वाक्षरी बैक ऑफ इंडिया येथे काढण्याचे ठरले व तश्या प्रकारचा ठराव मंजूर झाला. तसेच मा श्री नारायणराव राणे साहेब, श्री निलेश नारायणराव राणे साहेब आणि श्री निलेश नारायणराव राणे साहेब यांची भेट घेण्याचे ठरले. अश्या तऱ्हेने या विषयांवर खेळीमेळीने चर्चा झाली व आलेली वर्गणी श्री मंगेश मनोहर राणे यांचेकडे जमा करण्यात आली.

पुढील कार्यक्रमासाठी झटून काम करावे अशी इच्छा श्री मधुसुदन श्रीधर राणे (सल्लागार) यांनी व्यक्त केली.

या मिटिंगच्या वेळी संपूर्ण चहापाणी व्यवस्था श्री मंगेश मनोहर राणे यांच्या कुटूंबियांनी केली त्याबद्दल त्या संपूर्ण कुटूंबियांचे आभार मानन्यात आले.

शेवटी श्री पांडूरंग सावजी राणे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन सभा रात्री 8:30 वाजता संपली असे जाहिर केले.

पु

---